# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०४/२०२४ (गुरूवार) दुपार**

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद**

**वाहनासह एकुण ८१४०००० /— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

**नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई**

दिनांक २५/०४/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे रामटेक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधारांकडून माहीती मिळाली की, सोंडा जि. भंडारा येथुन अवैध्यरित्या रेती भरुन दोन टिप्पर रामटेक कडे येत आहेत. अशा मिळालेल्या विश्वसनिय माहीतीवरून स्टाफ यांनी नाकाबंदी करून खिंडशी तलावाजवळ रोडवर तुमसर मार्गे कडुन रामटेककडे जाणाऱ्या रोडने दोन टिप्पर एका मागे एक येतांना दिसल्याने त्यांना थांबण्याचा इशारा केला असता दोन्ही टिप्पर चालकांनी त्याचा ताब्यातील टिप्पर तिथे न थांबवता समोर निघुन गेले. त्यामुळे स्टॉफनी दोन्ही टिप्परचा पाठलाग करून १) ट्रक क्र. MH 49 BZ 0152 चा चालक आरोपी नामे —हर्षल गणेश वाडवे वय २९ वर्ष रा. KGN सोसायटी काटोल नाका मकड धोकडा नागपुर याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १२ ब्रास रेती प्रति ब्रास ५०००/—रू. प्रमाणे किंमती ६०,०००/—रू. २) ट्रक क्र. MH 49 BZ 2152 चा चालक नामे अजमंद कलंदर बेग वय ३९ वर्ष रा. सुरेंद्र नगर गिट्टी खदान नागपुर याने आपल्या वाहनात १२ ब्रास रेती प्रति ब्रास ५०००/—रू. प्रमाणे किंमती ६०,०००/—रू. दोन्ही वाहनातील एकुण २४ ब्रास रेती अवैधरीत्या विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपींच्या ताब्यातून १) ट्रक क्र. MH 49 BZ 0152 किंमती ४०,००,०००/—रू. मध्ये १२ ब्रास रेती किमती ६०,०००/—रू. २) २) ट्रक क्र. MH 49 BZ 2152 किंमती ४०,००,०००/—रू. मध्ये १२ ब्रास रेती किंमती ६०,०००/—रू. ३) विविध कंपन्यांचे मोबाईल २०,०००/—रू. असा एकुण ८१,४०,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **आरोपी १) हर्षल गणेश वाडवे वय २९ वर्ष रा. KGN सोसायटी काटोल नाका मकड धोकडा नागपुर २) अजमंद कलंदर बेग, वय ३९ वर्ष, रा. सुरेंद्र नगर गिट्टी खदान नागपुर (३) मालक नामे सलमान अब्दुल रहमान वय ४८ वर्ष रा. टेका नाका नागपुर ४) शुभम** याचे विरुध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३७९, १०९, ३४ भादंवि सहकलम ४८ (७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६, सहकलम ४,२१ खानी खनिजे (विकास आणि नियमन) अधि. १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, पोना प्रणय बनाफर, पोअं बालाजी बारगुले, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर